# Career Opportunities in Commerce

**Organized by**

**Department of Commerce**

***Adarsh Education Society's***

**ARTS, COMMERCE AND SCIENCE COLLEGE, HINGOLI**

**Chair Person**

**Dr. Vilas Aghav**

I/c Principal

(Adarsh College, Hingoli)

**Speaker**

**Dr. Ashish B. Gattani**

Head, Department of Commerce

Adarsh College, Hingoli

**Special Invitee**

**Shri. Ramesh Dalvi**
(Vice Principal)
Adarsh Jr. College, Hingoli

**Shri. Anil Shastri**
(Supervisor)
Adarsh Jr. College, Hingoli

**January 02, 2023 11:00am to 01:00 pm**

***Venue: - Adarsh College, Hall No. 3***

**Organizing Committee**

Shri. S. G. Sahu, Ku. S. A. Pupulwad, Smt. Rachna Pareek

And

**All Teaching & Non-Teaching Staff.**

# वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना रोजगाराच्या विविध क्षेत्रातील संधी

**हिंगोली :** येथील आदर्श महाविद्यालयांच्या 12 वी वाणिज्य वर्गातील विद्यार्थ्यांसाठी ' वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना रोजगाराच्या विविध क्षेत्रातील संधी या विषयावरील तज्ञ मार्गदर्शक डॉ.प्रा. आशिष गट्टानी यांचे व्याख्यान आयोजीत करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. विलास आघाव हे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. रमेश दळवी, पर्यवेक्षक प्रा.अनिल शास्त्री, डॉ. बस्वराज लक्षटे हे उपस्थित होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी प्रमुख वक्ते म्हणून वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. आशिष गट्टानी होते. 12 वी वाणिज्य वर्गातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. आशिष गट्टानी यांनी 12 वी नंतर वाणिज्य विभागातून वेगवेगळ्या संधी उपलब्ध आहेत याबद्दल सखोल माहिती दिली. आपल्याच महाविद्यालयात पदवी शिक्षण घेत असतानाच वेगवेगळे प्रोफेशनल कोर्सेस उपलब्ध असल्याचे सांगितले. यामध्ये सी.ए. फाउंडेशन व सी. एस. फाउंडेशन, सी.एम.ए. कोर्सेस चे महत्व सांगितले. त्यामुळे पदवी प्राप्त होताच मिळणाऱ्या वेगवेगळ्या नोकरी विषयक संधी मिळतील याबद्दल सविस्तर माहिती दिली. याप्रसंगी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधत त्यांच्या प्रश्नांची उत्तरे दिली. वाणिज्य शाखेत विद्यार्थ्यांना उपलब्ध असलेल्या सर्व पदवी व पदवीनंतरचे कोर्सेस याबद्दल प्रोजेक्टर द्वारे पि.पि.टी. दाखवून मार्गदर्शन केले, त्याचबरोबर कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. रमेश दळवी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना व्याख्यानाचा लाभ घ्यावा वाणिज्य विभागातून विद्यार्थ्यांना भरपूर मोठ्या प्रमाणात या क्षेत्रात व्याप्ती उपलब्ध असल्याचे सांगितले व योग्यवेळी योग्य व्याख्यान झाल्यामुळे संधीचे सोने करण्यास शुभेच्छा दिल्या. पर्यवेक्षक प्रा. अनिल शास्त्री यांनी अशी व्याख्यानांमुळे विद्यार्थ्यांना आपले ध्येय निश्चित करण्यास मदत होईल असे मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. विलास आघाव यांनी विद्यार्थ्यांना विविध कोर्स करण्याकरिता विद्यार्थ्यांना हिंगोली बाहेर आता जाण्याची आवश्यकता नाही .सर्व कोर्स पदवी प्राप्त करताना आपल्या महाविद्यालयात सर्व कोर्सेस उपलब्ध करून देण्यात येतील.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.सुरेंद्र साहू यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. सपना पुपुलवाड यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी प्रा.रचना पुरोहीत, प्रा.जुनेद शेख, प्रा.अमित पट्टेबहादूर व सेवक जाधव एस. डी. यांनी परिश्रम घेतले. याप्रसंगी 12 वी वाणिज्य शाखेचे सर्व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**Date : 05/01/2023**
**Dainik LokPrashana**

# Photos Of the Event










